Impact Factor-7.675 (SJIF)


ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

## April -2020








**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor:**
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

# INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | महानुभाव पंथाच्या वाङ्मयाची वाटचाल : एक दृष्टिक्षेप | डॉ. गणेश क. टाले | 1 |
| 2 | अन्न प्रकिया उद्योगाचे महत्व आणि समस्या | प्रा. डॉ. विनोदकर विजयकुमार सुरेंद्र | 6 |
| 3 | ग्राहक संरक्षण चळवळीचा सामाजिक आणि आर्थिक विकासातील सहभाग | शिल्पा सु. बांगडे /प्रा. डॉ. शालिनी के. पांडे | 10 |
| 4 | खाद्यपदार्थ संरक्षण करण्याच्या पध्दतीचा अभ्यास | प्रा. डॉ. विद्या एम. ठवकर | 13 |
| 5 | महिला सक्षमीकरणात स्वयंसहाय्यता महिला बचत गटाची भुमिका,' एक अध्ययन | प्रा. मुरलीधर रेवतकर | 18 |
| 6 | बौद्ध धम्म व पर्यावरण संवर्धन | प्रा. डॉ. राहुल वि. दखणे | 23 |
| 7 | भारतातील दारिद्रय एक समस्या | प्रा. डॉ. गावडे एस. एम | 26 |
| 8 | स्त्री सक्षमीकरण आणि आर्थिक स्वांतत्र्य | डॉ. वासंती निचकवडे | 31 |
| 9 | संत गाडगे बाबांचे व्यक्तीमत्व आणि कीर्तन ही भारतीय लोकसंगीताला मोठी देण. | प्रा. शरद पुंडलीक गजीभिये | 34 |
| 10 | व्यक्तिमत्व और मनोवैज्ञानिक कल्याण में सम्बन्ध का अध्ययन | डॉ. दीपा बलखंडे | 39 |
| 11 | प्राचीन सिंधू संस्कृतीचा ऱ्हास: प्रतिकूल पर्यावरण एक भौगोलिक अध्ययन | प्रा.संजीव विश्वनाथ भुयार | 44 |
| 12 | संगीत शिक्षा में वैज्ञानिक उपकरणों का योगदान | डॉ. प्रज्ञा मेश्राम | 50 |
| 13 | गोटूल (युवागृह) :– एक सामाजिक व शैक्षणिक संस्था | डॉ. प्रमोद ना. घ्यार | 53 |
| 14 | सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून 'उपमितिभवप्रपंचकथा' या काव्याचे विवेचन | डॉ. ओमकुमार टोम्पे | 56 |
| 15 | छोटानागपुर खुंटकट्टी भूमि-व्यवस्था एक अवलोकन | प्रो. डॉ.अंजू शरण | 63 |
| 16 | ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या (मुल व मुली) शैक्षणिक आकांक्षा स्तराचा तुलनात्मक अभ्यास | डॉ.गुणवंत सोनोने | 68 |
| 17 | हस्तक्षपाच्या कार्यानीति – तार्किक भावनिक वर्तन उपचार पद्धती (REBT) | शिल्पा स. येळणे | 76 |
| 18 | The Development And Shaping Of Environmental Laws In India. | Mr. Nilesh V. Dhande | 80 |
| 19 | Women empowernment: problems and prospects Status Of Women Empowerment In India | Laxmi Subhash Parihar | 83 |
| 20 | Impact of Effective and Quality Training of Field Health Staff in Early Case Detection, Creating Awareness, Reducing Human Right Violation | | 88 |

| | | |
|---|---|---|
| | of PAL in Amravati district **Raju Ramrao Dange** | |
| 21 | Design and Implementation of QoS for Underwater Communication **Hasina Manohar Nandeshwar** | 93 |
| 22 | Role Of Library And Its Sources In Learning **Prof. Siddharth A. Patil** | 98 |
| 23 | Yoga Therapy In Recent Times **Dr. Subhash M. Shekokar** | 101 |
| 24 | Effect of Culture on the Buying Behavior of Clothing by College going Students with Introvert, Ambivert and Extrovert personality **Dr.Sadhana S.Patil** | 104 |
| 25 | Money Management For Homemaker **Dr. Shubhangi Kukekar** | 109 |
| 26 | Retelling the Ramayana and Mahabharata by AnandNeelkantan, with reference to Asura and Ajaya **Mr.Sanjay M.Nandagawali** | 111 |
| 27 | A New Dimension Of Right To Privacy With Reference To Telephone Tapping Cases – An Analytical Study **Adv. Neha V. Goenka** | 115 |
| 28 | Tortious Liability Of State Under Constitution With Reference To Judicial Pronouncement **Adv. Kirti Bajaj** | 120 |
| 29 | Water Management and Conservation by Major and Medium Project in Yavatmal District of Maharashtra State **Dr. Aruna P. Patil** | 124 |
| 30 | The Status of Digital Schools in Maharashtra and Teachers' Attitude towards using New Technology: A study **Dr. Ujjwala D. Sadaphal** | 130 |
| 31 | Needs of human rights and relationship with indian constitution **Adv. Ratnakar Sudamrao Bansod.** | 137 |
| 32 | Ruth P. Jhabvala: A Writer with Divided Self **Dr. J. M. Saboo** | 141 |
| 33 | Translation and context Impact of translation on original text: special reference with o.v. Vijayan's 'the legends of khasak' **Dr. Jagdish K. Jangale** | 145 |
| 34 | E-Content Development : Challenges, Importance & Benefits **Dr. Narendra K. Nagpure** | 149 |
| 35 | Philosophy of Physical Education and Sports **Dr. Sanjay Khalatkar** | 153 |
| 36 | The study of core attributes of Generation Z and their expectation towards digital payment products in India **Dr. Anand G. Naranje** | 157 |
| 37 | 'Empowered Women in GithaHariharan's 'The Thousand Faces of Night' and 'When Dreams Travel' **Dr. Rakesh V. Taimale** | 160 |
| 38 | Role Of Judiciary In The Protection Of Wild Life In India **Adv. Dr. Ravindra Ulhas Marathe** | 165 |
| 39 | Human Rights Norms and Principle of Social Justice **Dr. Nandkishor K. Ramteke** | 168 |
| 40 | Meditation keeps us motivated. **Dr.Ramteke Vanita Deodas** | 174 |

ISSN : 2278-9308
April 2020


| | | |
|---|---|---|
| 41 | Drinking water amenity of urban centres in buldana district A geographical study **Dr. Amol R Bhuyar & Dr. Sandip S. Bhavsar** | 176 |
| 42 | Globalization, Industrialization Social Issues and Environment Situation in India **Anil Kosamkar** | 181 |
| 43 | Translation, Culture and Global Era **Prof. Mahendra Telgote** | 185 |
| 44 | अध्यापनात ई- तंत्रज्ञानाचा वापर प्रा.डॉ. डी.एल. पाटील | 188 |
| 45 | नव्वदोत्तरी काळातील निवडक मराठी ग्रामीण कवितेतील कृषिनिष्ठ जाणिवा डॉ. नरेंद्र जनार्दन पाखरे | 190 |
| 46 | आजची जीवनपद्धती व मराठी साहित्य प्रा. डॉ. प्रल्हाद वावरे | 196 |
| 47 | भुजंग मेश्राम यांची उलगुलानची कविता :एक शोध डॉ प्रफुल्ल गवई | 199 |
| 48 | वैज्ञानिक उपकरणांमुळे भारतीय संगीताचा झालेला प्रचार—प्रसार प्रा.डॉ.चंद्रशेखर कुडमेथे | 203 |
| 49 | Prehistoric Period Ornaments of Maharashtra **Dr G S Mahadik** | 206 |

**B.Aadhar'** *International Multidisciplinary Research Journal*
**Impact Factor - ((SJIF) -7.675,**
**Special Issue**
**ISSN : 2278-93**
**April 2020**

# भुजंग मेश्राम यांची उलगुलानची कविता :एक शोध

डॉ प्रफुल्ल गवई
एस पी एम कॉलेज,चिखली,बुलढाणा

मराठी साहित्यविश्वात आपल्या काव्य लेखनाने वेगळे स्थान निर्माण करणा-या कवींमध्ये भुजंगमेश्राम यांचे नाव महत्वपूर्ण आहे. त्यांची कविता दलित आदिवासी जाणिवांची कविता आहे. 'उलगुलान', 'अभुजमाड'अशा दोनच प्रकाशित काव्यसंग्रहाद्वारे ते अजरामर झालेले कवी आहेत. भूजंग मेश्राम यांचा जन्म ९ऑक्टोबर १९५८ रोजी झाला. किनवटच्या (जि. नांदेड) अरण्यपत्रातील तुळशीमलकागुडा हे छोटेसे गाव आहे. या खेड्यातच त्यांचे बालपण आणि प्राथमिकशिक्षण झाले. किनवटची आश्रम शाळा. नांदेडचे यशवंत महाविद्यालय आणि मुंबईचेसिद्धार्थ महाविद्यालय इथे त्यांचे पुढील शिक्षण झाले. बी.ए. आणि दोनपदविका मिळवून ते महाराष्ट्र शासनाच्या सेवेत राजपत्रित अधिकारी पदावर रुजू झाले.कविता हे त्यांच्या लेखनाचे विशेष क्षेत्र होते. शिवाय त्यांनी काहीसंशोधनात्मक लेखही लिहिलेले आहेत. गोंडी ही त्यांची मातृभाषा, गोंडी शिवायत्यांनी बंजारी, परधाती, वारली बाणेरी. वऱ्हाडी इत्यादी बोली भाषेतूनहीआपल्या कविता लिहिल्या. असे असले तरी प्रमाण मराठी भाषा हेच त्यांच्या कवितेचे माध्यमहोते. मराठी कवितेच्या बहुमुखी प्रवाहात आदिवासी कवितेला स्वतंत्रअस्तित्व निर्माण करून देण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता.

"अभुजमाड" याकाव्यसंग्रहाच्या प्रारंभीच काही नांदी आहेत. भुजंग मेश्राम यांनीच अभुजमाडअसे नाव योजले आहे. अभुजमाड हा छत्तीसगडमधील बस्तर या आदिवासी क्षेत्रातलाअतिशय दुर्गम असा डोंगराळ भाग.नारायणपूर तहसिलमधील सुमारे १५०० ते ४०००चौरस मैलांच्या या घनदाट गर्द अरण्याला हिंदी भाषक अबुझमाड किंवा अबुजमाड असेम्हणतात. या भागात गोंड आदिवासीच्या तीन महत्त्वाच्या उप जनजातीपैकी एक आणिसगळयात आदिम अशा अभुज माफिया आदिवासींची विरळ वस्ती आहे. स्वतःला निसर्गाचाचएक अंश मानणारे, फिरत्या शेतीवर व शिकारीवर उदरनिर्वाह करणारे, धरतीमातेलाजखमा होतील म्हणून जमिनीत नांगर न चालवणारे, बाहेरच्या जगाशी संबंध न ठेवणारे, आदिम अभुज माडिया या गोंड आणि त्यांचे सामाजिक-सांस्कृतिक भाषिक जीवन हाभुजंग मेश्राम यांचा जन्मभराच्या आस्थेचा विषय होता आणि त्यात ते आपली मुळंशोधत होते."[१] कवितेची भूमिका विशद करतांना ऊलगुलान या काव्यसंग्रहात दोन शब्दया आपल्या मनोगतात कवी म्हणतात, "ऊलगुलान म्हणजे सर्व क्षेत्रात एकाच वेळी उठावकरणे. बिरसा मुंडाच्या चळवळीमधील कृती कार्यक्रमाची ती घोषणा होती. बिरसामुंडाने सर्व पातळयांवर त्याचा अंमल केला. ऊलगुलान हे माझ्या संग्रहाचे नावझाले आहे. कारण माझी कविता सर्व पातळयांवर वावरते. संवाद साधते, असेवाटते. ज्यांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन लिहू लागलो त्या डॉ बाबासाहेबआंबेडकरांचे जन्मशताब्दी वर्ष, तर म. ज्योतिबा फुल्यांचे स्मृती शताब्दीवर्ष या दोन महानुभवाना मी विनम्र अभिवादन करतो मी १९७६ च्या दरम्यानकविता लिहून लागलो गेल्या १३ वर्षांतील निवडक कविता या संग्रहात समाविष्टआहेत. माझी कविता वेगळ्या बोली मधून बोलते, सर्वहार जाती जमातीच्यासंघर्षाचे विश्व टिपते. तिला स्वतःची भाषा आहे. अस्तित्व आहे. याबहल अधिकसांगण्याची गरज नाही. असे वाटते."[२]

दलित-आदिवासीचळवळीतून भुजंग मेश्राम यांचे व्यक्तिमत्व घडल्यामुळे या चळवळीबद्दल व चळवळीतील सख्यामित्रांबद्दल, तसेच फुले-आंबेडकरांच्या वारशाबाबत कृतज्ञता व्यक्त करतात.नव्या उठावाच्या तयारीत आणि स्वतःच्या अस्तित्वाचे भान ठेवून मराठी कवितेतआपल्या भाषेच्या, आशयाच्या दृष्टीने कवी उभा आहे.

भुजंग मेश्राम हा अरण्य बेटावरचा कवी आहे. त्यांना अरण्य बेटावरच क्षितीज फुलवायचे आहे. म्हणून आपल्या कवितेत ते म्हणतात,

*'मी समजलो, ते निसर्गात रस्त्यांशिवाय काहीतरी शोधत आहेत..*
*कदाचित वसाहती विषयी प्रश्न असतील,*
*अथवा प्रश्नांच्या वसाहती..*
*ज्या त्यांना खेळण्यांसारख्या खेळून मोडता येतात*
*शक्य झाल्यास पुनर्वसनाचे बेतही त्यांच्या शब्दांत*
*मी ओळखलं की, ते वादळात तत्वाशिवाय काहीतरी शोधत आहेत.*
*मी फक्त फुलवत राहिलो मनाचे वादळी बेट आणि उद्याच्या युद्धाचे नियोजित बे'*

(अरण्यबेट पृ.क्र. १)

अरण्यबेटविषयीची कमालीची आशा त्यांनी व्यक्त केली आहे. आपला अरण्यबेट जणूकाहीस्वयं प्रकाशित असल्याचे कवीला वाटते. कट्टा या कवितेत कवी म्हणतो

*'आम्ही. कधी कट्ट्याभोवती सर्व*
*कधी आपल्याभोवती*
*म्हटलं तर. स्वयंप्रकाशित ग्रह*
*म्हटलं तर'*

(कट्टा पृ.क्र. २२)

सेटलमेंट या कवितेत राजकीय भूमिका कवी उपरोधाने मांडतो लोकशाहीचा आपण स्वीकार केला पण आपल्या वाट्याला काय आले याची हकीगत कवी सांगतो

*'लोकशाहीचं हे देऊळ*
*अहिंसेच्या नवसाला पावते सांगतात*
*फकस्त दुधाचे ताकावर येऊ शकते अपवादात*
*त्यांनी कुळ मांगीतले, भेटले नवाटी*
*आम्ही मुक्ती मागीतली, भेटली विमुक्ति*
*आता आमचं काही मागणं नाही.'*

(सेटलमेंट, पृ.क्र. २५)

अशीअभावग्रस्तता लोकशाहीत सर्वहारा समूहावर असल्याचे कवी नोंदवतो एक निराशेचासूर व्यक्त करतो बिरसा मुंडा या प्रेरणेशी संवाद साधतांना बिरसामुंडा याकवितेत पुढे तोम्हणतो

*'लोक तुझी वाट पाहत आहेत*
*ज्या खडतर वाटेने तू निघून गेलास ती पायवाट*
*आजचा राजमार्ग झालाय तुझ्या आठवणी सारखाच...*
*नागड्या रात्री दहशतीचे साम्राज्य असतांनाही*
*असंख्य तारकांसह चंद्र असावा तसा*
*आईच्या मोळी बाजारात, तेंदु पानांच्या खळ्यांवर.*
*व्याजाने गेलेल्या शेतांवर, मजुरीच्या बरवड्यावर*
*इतकेच नव्हे कोडपाखिंडी च्या पोळांत,*
*बस्तरच्या गोटूलवर, इंदरवल्लीच्या बाजारात,*
*चंद्रपूरच्या अरण्यात. तूच दिसतोस हे आमच्या सोबत*
*सांग, तुला विसरावं तरी कसं?'*

(बिरसा मुंडा, पृ.क्र. ३०)

कवीच्यासमूहाला दिशादर्शक म्हणून बिरसामुंडा या प्रेरणास्रोताची आठवण सातत्यानेयेते. काळोखातून उजेडात आणणारा, दु:खाचं निवारण करणारा. समुहाचं भलंकरणा-या बिरसामुंडाला समूह विसरु शकतच नाही. कवी म्हणतो

*'आईला पहाटेच जात्यावर तुझी गाणी गातांना*
*मी ऐकत असतो डोळे मिळून*
*डोंगरउतरणीवर बाया रेरौ रेलोंची तुला घालतात शपथ*
*तो ही डोळ्यामध्ये घेते बांधून*
*मजुरदार पात हाकताना. जागल करतांना, गुरे वळवतांना*
*गवत निंदकांना, या हातावर त्या हातावर देतात तुला*
*प्रसाद वाटावा तसा, ती सुद्धा. मी घेतो अन् वाटतो*
*सांगायचा मुद्दा म्हणजे मी शिकत असतो*

ISSN : 2278-9308
April 2020

तुझ्या आदिम विद्यापीठाची विषुववृत्त रेषा...
तर लोक फक्त गाणीच गातात असे नव्हे,
ते ऐकतात-बोलतात, मरतात-
घरदार-शाळा-बाजार-मोर्च्यात नी जंगलात
एका सशक्त बदलासाठी
खरं तर, ह्यापैकी तुला कुणीही पाहिलं नसेल
मी सुद्धा
म्हणून तर आमच्या असंतोषातून तूच मला दिसतोय एकटा'

(बिरसा मुंडा, पृ.क्र. ३०-३१)

बिरसामुंडाम्हणजे सशक्त बदल घडविणारा संघर्ष. सकाळी उठल्यापासून तर दिवसरात्रबिरसामुंडा हे प्रेरणास्त्रोत जीवनात परिवर्तन घडवित आहे. लोक उठता-बसता.शाळेत, परिसरात, जंगलात, गुरं वळवतांना, गवत निंदतांना, इतकंच नव्हे तर आईदेखील जात्यावर दळण दळतांना तुझीच (बिरसामुंडा) आठवण काढते अशी प्रतिमाआपल्या प्रेरणास्त्रोताची आहे असे कवी स्पष्ट करतो. असंतोषाचे प्रतीक म्हणूनकवीच्या अंतःकरणात बिरसा मुंडाची प्रतिमा आहे. पुढे कवी म्हणतो,

'तू नाहीस,
आहे फक्त अरण्यात वाढणारा असंतोष
अन् ओठावर तूच दिलेलं छोटं गीत
ऊलगुलान ! ऊलगुलान ! ऊलगुलान !
जे आता बनलं आहे सांस्कृतिक आंदोलन
खरंच, आम्हाला घाई झाली म्हटलं तरी चालेल
परंतु संस्कृतीकरणाला आमचा नकार आहे
अंधाराला आहे अगदी तस्सा
रान विभागणाऱ्या कंत्राटी व्यवस्थेला आमचा नकार
खोल्यांच्या उच्चारासारखा'

(बिरसा मुंडा, पृ.क्र. ३१)

विशेषतः अन्याय करणाऱ्या व्यवस्थेला कवीचा नकार आहे. कवी बिरसा मुंडा उगव रे म्हणून हाक मारतो.

'बिरसा, तू कुठूनही केव्हाही उगव रे
गवत कापणाऱ्या विळ्यांतून, मोळीणींच्या कुऱ्हाडीतून,
शेता शेतांवरील मजुरीतून, गावागावांतील वेढीतून,गॅलरीत आणलेल्या गोटुली रंगातून, कारागिरांच्या भट्टीतून
इथून-तिथून
- पूर्व-पश्चिम-दक्षिण-उत्तरेतून
कुठूनही येरे बिरसा, दे फुलवित शेत
लोक तुझीच वाट पाहात आहेत'

(बिरसा मुंडा, प्र.क्र.३२)

लोकांच्यामनातील मनोगत कवीने बिरसा मुंडा या कवितेच्या रुपाने मांडले आहे. कवीलानवे जन आंदोलन उभे करण्यासाठी कवीने सामान्याच्या अंतःकरणातील हालचाल याकवितेच्या निमित्ताने मांडली आहे. एक नवा आशावादही कवी शब्दबद्ध करतो.

कवीमाणसावर प्रेम करणाराआहे. माणसाचे दुःख समजून घेणारा आहे. त्यांच्याप्रश्नाला वाचा फोडणारा आहे. त्यांच्या हृदयाला शब्द देणारा आहे. त्यांच्याश्रमाला मूल्य प्रदान करणारा आहे. माणसाविषयी अपार करुणा कवीच्या मनातआहे. माणूस हा कवितेचा केंद्रबिंदु आहे. 'अभुजमाड' या आपल्या दुसऱ्या काव्यसंग्रहातकवी भुजंग मेश्राम यांनी माणसाबद्दल निष्ठा व्यक्त केली आहे. ती कशी? तर कवी म्हणतो,

'मानवीय पातळी म्हटली की प्रश्न सू की कू

*संस्कृत म्हणजे माणूस होणं जणू*
*माणूस होणं यथासांग*
*जणू नेणिवाचा बाळ होणं*
*संपूर्ण माणूसबाईला बालपणातच पडतात*
*स्वप्नं आणि प्रश्न*
*ज्याचे तोच लावू शकतो अर्थ*
*माणसाबद्दल, माणसाचा टाळायचाच*
*झाला तर अनर्थ!'*

(माणसाबद्दल, पृ.क्र.८७)

थोडक्यातमाणसाविषयीचे मोल जाणणारी ही कविता आहे. भुजंग मेश्रामच्या कवितेबद्दल, तिच्या भाषेबद्दल मतव्यक्त करतांना जेष्ठ समीक्षक चंद्रकांत पाटील म्हणतात, "भुजंग मेंश्राम यांच्या कवितासमकालीन मराठी कवितेतला प्रखर, आणि अनन्यसाधारण टप्पा आहे. प्रचंडसृजनशक्ती. अद्भुत भाषा सामर्थ्य, कुठल्या कवितेत प्रमाणभाषेतून बोलीभाषाआणि बोली भाषेतून प्रमाण भाषेत अगदी सहजपणे होणारे अकृत्रिम स्थित्यंतरे, विलक्षण शब्दयोजना आणि नव्या व अर्थसंपृक्त शब्दरुपांची निर्मिती.समकालीन जागतिक वास्तवाची जाण, भावात्मकतेतून बौद्धिक होणारे संक्रमण, बौद्धिक आकलनातून येणारी चिंतनशीलता, साशंकतेतून अन्य सतर्कतेतून येणाराखोलवरचा व तीव्रतर उपहास उपरोध, अनुभवांनाच ज्ञानतंतू करण्याचा प्रयत्न, अढळ बांधिलकी इत्यादी अनेक गुणवैशिष्ट्यांनी त्यांची कविता महत्त्वाची झालीआहे. समकालीन जगण्यातल्या एकूण एक घटना विकार विचारांचे धागेदोरे राजकीयवास्तवाशीच जोडलेली आहेत. या त्यांच्या दृढ विचारामुळे त्यांची कविता अनन्यहोते."[3] यात काही शंका नाही.

नेताजी राजगडकर यांचेभुजंग मेश्रामच्या कवितेवरील मत लक्षात घेण्यासारखे आहे. ते म्हणतात, "ऊलगुलान हाआदिवासी साहित्याचा जाहीरनामाच आहे. आदिवासी साहित्य ही काही मराठीसाहित्याची प्रतिक्रिया नाही. तशी भुजंग मेश्रामांची कविता म्हणजे येथीलतथाकथित व्यवस्थेवरचे निवेदन किंवा अभिप्राय नाही. ही कविता नेमकेपणाने, अंतर्बाह्य संघर्ष चितारणारी, एकाच वेळी सर्व पातळ्यांवर उभी राहणारी आहे.नामदेव ढसाळानंतर या दशकातील आपल्याला अंतर्मुख करणारी, मराठी व दलितकवितेत रुढ होऊ पाहणाऱ्या मठांना हादरे देणारी ही कविता आहे.
'अभिव्यक्तीके सारे खतरे अब उठाने होंगे' असे गजानन माधव मुक्तीबोधांनी एका कवितेत म्हटलेआहे. भुजंग मेश्रामांची कविता वाचतांना याचा प्रत्यय येतो एका जंगलांकडूनदुसऱ्या जंगलाकडे स्थलांतरीत होणाऱ्या माणसांचा हा गाज आहे. त्यातसेंटलमेंटचे कुंपण आहे. आश्रम शाळेतले बंडखोर बालविश्व आहे. तथाकथित मुख्यप्रवाह आहे. आर्ट गॅलरीतील आदिवासी कला आहे. अभयारण्यातले म्युझियम आहे.नर्मदा आहे. तिज्जनबाई आहे आणि या सर्वांवर सर्वहारा हितसंबंधांचाअन्वयार्थ आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही कवीची प्रेरणा आहे, तरगौतमबुद्धांचा विचार हा जीवनमार्ग झाला आहे. पोटापलीकडे आणि जातीपलीकडेगेल्यावर टोळी समुहाची व संस्कृतीची ही झाडाझडती आहे. शस्त्रक्रिया आहे. याकवितेची नाळ चळवळीशी बांधली आहे. दलित साहित्य व आदिवासी साहित्य यामधलाहा पूल सक्षम आहे. साहित्याच्या बोधी वृक्षावर आदिवासी कवितेचा हा मोहोळ, जसा मधाळ, तसा डंखराज आहे."[४]अशी वैशिष्ट्ये भुजंग मेश्राम यांच्या कवितेचीसांगता येतील.

भुजंग मेश्राम हा सिमेंटच्याजंगलातील हरवलेल्या माणूसकीचा शोध आणि वेध घेऊ पाहणारा आदिवासी कवी. त्याचीकविता धारदार उपहास,व्यवस्थेच्या सखोल चिंतनामुळेकलात्मकदृष्ट्या आणि तत्त्वदर्शनाच्या सीमा ओलांडून एकूणच मराठी कवितेलात्यांची कविता एक वेगळे परिणाम देते. यात शंका नाही.

संदर्भ सूची

१) मेश्रामभुजंग, अभुजमाड, लोकवाङ्मय, मुंबई, प्र.आ. २००८, पृ.क्र. परिचय
२)तत्रैव, पृ.क्र. मलपृष्ठ
३)मेश्रामभुजंग, ऊलगुलान तथागत प्रकाशन, ठाणे, १९९०, पृ.क्र. मनोगत (दोन शब्द)
४) मेश्रामभुजंग, अभुजमाड, तत्रैव, पृ.क्र. मलपृष्ठ